(इंग्रजीमध्ये टंकलिखित न्यायनिर्णयाचा मराठीत अनुवाद)

**सर्वोच न्यायालय अहवाल, (२०१८) १४ एस. सी. आर. २३२**

**पान क्रमांक २३२ ते २३८**

**(फौजदारी अपील क्र. १४८७/२०१८)**

**नारायण मल्हारी थोरात**

**विरुद्ध**

**विनायक देवराव भगत आणि अन्य**

**(फौजदारी अपील क्र. १४८७/२०१८)**

**२८ नोव्हेंबर, २०१८**

**[न्यायमूर्ती उदय उमेश लळीत आणि न्यायमूर्ती डॉ. धनंजय वाय. चंद्रचूड]**

दंड संहिता, १८६० – कलम ३०६ – अपीलकर्त्याचा मुलगा आणि सून शाळेत ज्या शिक्षक होते, जिथे उत्तरवादी देखील शिक्षक होते – आरोप असा आहे की उत्तरवादी अपीलकर्त्याच्या सुनेच्या मोबाईलवर वारंवार फोन करून तिचा छळ करत असे – अपीलकर्त्याच्या मुलाने पहिल्या उत्तरवादीला समजावून सांगण्याचा आणि त्याने आपल्या पत्नीला फोन करणे थांबवण्याचा प्रयत्न केला, तरीही उत्तरवादीने वारंवार तिच्या मोबाईलवर कॉल करणे चालूच ठेवले – अपीलकर्त्याच्या मुलाने आत्महत्या

केली – उत्तरवादीविरुद्ध प्रथम खबरी अहवाल दाखल – रद्द करण्यात आला – चे औचित्य – निर्णय: असा ठाम आरोप आहे की उत्तरवादी सतत आत्महत्या केलेल्या व्यक्तिच्या पत्नीला तिच्या मोबाईलवर कॉल करत असे आणि तिचा छळ करत असे – या आरोपांना तपासादरम्यान नोंदवलेल्या आत्महत्या केलेल्या व्यक्तिची आई आणि पत्नी यांच्या जबाबांचा आधार आहे – आत्महत्येच्या ३-४ दिवस आधी आत्महत्या केलेली व्यक्ति आणि उत्तरवादी यांच्यात वाद झाला होता – या तथ्यांच्या प्रकाशात, तसेच आत्महत्या करताना लिहिलेल्या चिठ्ठीत उत्तरवादीवर ठोस आरोप करण्यात आले होते, अशा परिस्थितीत तपास पूर्ण व्हावयाचा असताना, चार्जशीट, असेल तर, दाखल व्हावयाची असताना, या टप्प्यावर उच्च न्यायालयाने उत्तरवादीचा आत्महत्येस सहाय्य्य करणे, चिथावणी किंवा अपप्रेरणा देण्याचा हेतू होता की नाही, यावर विचार करणे उचित नव्हते – उच्च न्यायालयाचा आदेश रद्द करण्यात आला – फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ – कलम ४८२.

**अपील मंजूर करताना, न्यायालयाने पुढील निर्णय दिला:**

**निर्णय: १.१ ठोस आरोप असे आहेत की पहिला उत्तरवादी आत्महत्या केलेल्या व्यक्तिच्या पत्नीला तिच्या मोबाईलवर वारंवार कॉल करत असे आणि तिचा छळ करत असे, ज्या आरोपांना तपासादरम्यान आत्महत्या केलेल्या व्यक्तिची आई आणि पत्नी यांच्या जबाबांनी पुष्टी केलेली आहे. उपलब्ध अभिलेखावरून असे दिसत आहे की आत्महत्येच्या ३-४ दिवस आधी आत्महत्या केलेली व्यक्ति आणि पहिला**

**उत्तरवादी यांच्यात वाद झाला होता. या तथ्यांच्या प्रकाशात, तसेच आत्महत्या करताना लिहिलेल्या चिठ्ठीत पहिल्या उत्तरवादीवर ठोस आरोप करण्यात आले होते, या परिस्थितीत पहिल्या उत्तरवादीचा आत्महत्येला सहाय्य करण्याचा , चिथावणी किंवा अपप्रेरणा देण्याचा हेतू होता का यावर उच्च न्यायालयाने विचार करणे न्याय्य नव्हते. या टप्प्यावर, जेव्हा तपास अजून पूर्ण झाला नसताना आणि आरोपपत्र, असल्यास, दाखल व्हावयाचे असताना, उच्च न्यायालयाने उत्तरवादीच्या पुरेशा मानसिक घटक किंवा हेतूवर विचार करण्याची गरज नव्हती . त्यामुळे, अपील केलेला न्यायनिर्णय आणि आदेश रद्द करण्यात येतो. या प्रकरणात फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत तपास स्थगित करण्यात आला असल्यामुळे; संबंधित प्राधिकाऱ्यांना जितक्या लवकर होईल तितक्या लवकर तपास पूर्ण करण्याचे निर्देश दिले जातात. [परिच्छेद १३, १४][२३८-सी-जी]**

नेटाई दत्ता विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य **(२००५) २ एस. सी. सी. ६५९**; एम. मोहन विरुद्ध राज्य, पोलीस उप अधीक्षक यांच्या माध्यमातून **(२०११) ३ एस. सी. सी. ६२६ : [२०११] ३ एस. सी. आर. ४३७;** केरळ राज्य व इतर विरुद्ध एस. उन्निकृष्णन नायर व इतर **(२०१५) ९ एस. सी. सी. ६३९ : [२०१५] ९ एस. सी. आर. ५६ – संदर्भित.**

**<u>केस कायदा संदर्भ:</u>**

| | | |
|---|---|---|
| **[२००५] २ एस. सी. सी. ६५९** | **संदर्भित** | **परिच्छेद ९** |

**[२०११] ३ एस. सी. आर. ४३७ संदर्भित परिच्छेद ९**

**[२०१५] ९ एस. सी. आर. ५६ संदर्भित परिच्छेद ९**

**फौजदारी अपिलीय अधिकारिता: फौजदारी अपील १४८७/२०१८.**

फौजदारी अर्ज (ए. पी. एल.) क्र. ३८०/२०१५ मध्ये मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांच्याद्वारे दिनांक २८.०३.२०१६ रोजी दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशामधून उद्भवलेले अपील.

अपीलकर्त्याचे वकील: सचिन पाटील, करुणाकर महालिक,

उत्तरवादींचे वकील: प्रतीक आर. बोम्बार्डे, जितेंद्र अशोक, निशांत रमाकांतराव कटनेश्वरकर.

**न्यायालयाचा न्यायनिर्णय न्यायमूर्ती उदय उमेश लळीत यांनी पारित केला.**

१. विलंब माफ करण्यात आला. अनुमती दिली.

२. हे अपील मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांच्याद्वारे दिनांक २८.०३.२०१६ रोजी दिलेल्या न्यायनिर्णय आणि आदेशाविरुद्ध आहे , ज्यामध्ये पहिल्या उत्तरवादीने दाखल केलेला फौजदारी अर्ज क्र. ३८०/२०१५ मंजूर करण्यात आला आहे आणि त्याद्वारे प्रथम खबरी अहवाल क्रमांक ३५/२०१५ नुसार त्याच्याविरुद्ध सुरू केलेली कार्यवाही रद्द केली आहे.

३. अपीलकर्त्याकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार वरील प्रथम खबरी

अहवाल क्र. ३५/२०१५, दिनांक १४.०२.२०१५ रोजी वाशीम पोलिस ठाण्यात दाखल करण्यात आला. असा आरोप केला गेला की अपीलकर्त्याचा मुलगा आणि सून एका गावी जिल्हा परिषदेच्या शाळेत शिक्षक होते, जिथे पहिला उत्तरवादी देखील शिक्षक होता; पहिला उत्तरवादी अपीलकर्त्याच्या सुनेच्या मोबाईलवर कॉल करून तिचा छळ करत असे; अपीलकर्त्याच्या मुलाने पहिल्या उत्तरवादीला समजावून सांगण्याचा आणि त्याला अपीलकर्त्याच्या सूनेस कॉल करणेपासून थांबवण्याचा प्रयत्न केला, तरीही पहिला उत्तरवादी तिच्या मोबाईलवर वारंवार कॉल करत राहिला; दिनांक ०९.०२.२०१५ रोजी त्याचा मुलगा आणि पहिला उत्तरवादी यांच्यात वाद झाला होता आणि दिनांक १२.०२.२०१५ रोजी त्या मुलाने आत्महत्या करीत असल्याची चिट्ठी लिहून आत्महत्या केली. त्या आत्महत्येच्या चिठ्ठीतील मजकुराचा खरा अनुवाद पुढीलप्रमाणे आहे:

> "साहेब पोलिस ठाणे अधिकारी, मी विनम्रपणे विनंती करतो की, माझे कौटुंबिक जीवन विनायक भगतने नष्ट केले आहे आणि म्हणून त्याला क्षमा करु नये, ही माझी विनम्र विनंती आहे आणि त्याला मरेपर्यंत फासावर लटकवावे, ही माझी शेवटची इच्छा आहे."

४. गुन्हा नोंदविल्यानंतर, पहिल्या उत्तरवादीने अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता, जो दिनांक २१.०२.२०१५ रोजी वाशीमचे मुख्य जिल्हा

आणि सत्र न्यायाधीशांनी नाकारला. या प्रकरणात पुढे मुंबई उच्च न्यायालयात फौजदारी अर्ज [ए. बी. ए.] क्र. ९६/२०१५ दाखल केला गेला. उच्च न्यायालयाने दिनांक ०७.०४.२०१५ रोजी आदेश देऊन विनंती फेटाळली. उच्च न्यायालयाने पुढील निरीक्षण नोंदवले:

> "... ... ... अर्जदाराचे वकिल आणि राज्याचे सहायक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर आणि त्यांच्या युक्तिवादांच्या पार्श्वभूमीवर, मी अभिलेखावरील आणि सहायक सरकारी अभियोक्ता यांनी माझ्या अवलोकनासाठी सादर केलेल्या पुराव्याचे वाचन केले आहे. जरी, अर्जदाराच्या वकिलाने हे सांगण्याचा प्रयत्न केला की, खोडसाळपणाबाबत अर्जदाराविरुद्ध असलेली आरोप सामग्री म्हणजे एक कागदाचा तुकडा, म्हणजेच आत्महत्या करतानाची चिठ्ठी आहे. युक्तिवाद असा होता की, भा. दं. वि. चे कलम ३०६ लागू होण्याकरिता आवश्यक हेतू किंवा अपप्रेरणा या घटकांचा निष्कर्ष केवळ या साहित्याच्या आधारे काढता येऊ शकत नाही. अहवालाचे अवलोकन केल्यावर, स्पष्टपणे दिसून येते की,तो केवळ अर्जदाराचा अनौपचारिक किंवा नैमित्तिक प्रयत्न नव्हता किंवा अर्जदाराचे

सहकारी कर्मचाऱ्या बरोबरचे मैत्रीपूर्ण संबंध नव्हते. अहवालातच म्हटले आहे की अर्जदार नेहमीच आत्महत्या केलेल्या व्यक्तिच्या पत्नीशी मोबाईलवर संपर्क साधत होता. अहवालात असेही म्हटले आहे की अर्जदाराला अशा कृत्यापासून दूर राहण्याची समज देण्यात आली होती. पण, अशा प्रयत्नानंतरही अर्जदार बधला नाही आणि त्याने त्याचे कृत्य थांबवले नाही. तपास यंत्रणेकडून आत्महत्या केलेल्या व्यक्तिच्या वडिलांच्या आणि आईच्या नोंदविलेल्या जबाबातून असे स्पष्टपणे सूचित होते की, जरी प्रारंभिकपणे त्या जोडप्याचे आणि अर्जदाराचे संबंध घरगुती आणि अनौपचारिक होते, अर्जदाराने सतत आत्महत्या केलेल्या व्यक्तिच्या पत्नीला कॉल करणे सुरू ठेवले. संजयच्या मृत्यूच्या ३-४ दिवसांपूर्वी, अर्जदार आनंद काळे यांच्या किराणा दुकानात गेला होता आणि त्यावेळी त्याला संजयने समज दिली होती, तरीही अर्जदार आत्महत्या केलेल्या व्यक्तिच्या पत्नीला कॉल करत राहिला. संजय मानसिक ताण आणि नैराश्याचा सामना करत होता. या बाबी संजयच्या आईच्या जबाबात नोंदविल्या आहेत. संजयच्या पत्नीच्या

जबाबात काय सूचित होते हे देखील लक्षात घेणे महत्त्वाचे आहे. संजयच्या पत्नीने स्पष्टपणे आणि निर्विवाद शब्दांत सांगितले की, जरी तिच्या पतीने तसेच तिने स्वत: त्याला समज दिली होती, तरी अर्जदार तिला सतत कॉल करत होता."

५. उच्च न्यायालयाने घेतलेल्या वरील दृष्टिकोनाला विरोध करण्यासाठी विशेष अनुमती याचिका (फौजदारी) क्र. ३४९७/२०१५ दाखल करण्यात आली होती, पण या न्यायालयाने दिनांक २९.०४.२०१५ रोजी विशेष अनुमती याचिकेमध्ये गुणवत्ता नसल्याचे सांगून ती नाकारली.

६. त्यानंतर, पहिल्या उत्तरवादीने, अपीलकर्त्याच्या अहवालावरून भा. दं. वि. च्या कलम ३०६ अंतर्गत दाखल केलेल्या गुन्ह्याचा नोंदवलेला प्रथम खबरी अहवाल क्रमांक ३५/२०१५ रद्द करण्याची मागणी करण्यासाठी उच्च न्यायालयात फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत फौजदारी अर्ज क्र. ३८०/२०१५ दाखल केला. तसेच, या गुन्ह्याशी संबंधित पुढील कारवाई थांबविण्याचा तात्काळ दिलासाही मागितला. हे लक्षात घेण्यासारखे आहे की, गुन्ह्याचा तपास अजून पूर्ण झालेला नाही.

७. पहिल्या उत्तरवादीने सादर केलेला आव्हान अर्ज उच्च न्यायालयाने स्वीकारला. पहिला उत्तरवादी अपीलकर्त्याच्या सुनेच्या मोबाईलवर कॉल करत असे

आणि अपीलकर्त्याच्या मुलगा आणि पहिला उत्तरवादी यांच्यात वाद झाले होते, याचा संदर्भ देऊन त्यानंतर उच्च न्यायालयाने खालीलप्रमाणे निरीक्षण नोंदविले:

> "अर्जदाराचा संजयला आत्महत्या करण्यास सहाय्य करण्याचा, चिथावणी देण्याचा किंवा अपप्रेरणा देण्याचा हेतू होता, हे सिद्ध करण्यासाठी वरील म्हणण्यातून कोणत्याही प्रकारचा पुरावा, अगदी प्रथम दर्शनी स्वरूपाचा देखील, उपलब्ध नाही. अर्जदाराच्या कोणत्याही सक्रिय किंवा थेट कृत्याचा उल्लेख नाही, ज्यामुळे संजयने आत्महत्या केली. तसेच, कोणतीही चिथावणी देण्याचा किंवा कोणत्याही हेतुपूर्वक कृत्याचा उल्लेख नाही, ज्यामुळे उत्तरवादी क्र. २ च्या मुलाला आत्महत्या करण्यास भाग पडले. मृत व्यक्तिच्या खिशात सापडलेल्या चिठीमध्येदेखील अशा कोणत्याही मजकुराचा समावेश नाही, जी असे दर्शविते की, अर्जदाराने एखादी चिथावणी किंवा अपप्रेरणा दिली, जी संजयला आत्महत्या करण्यास कारणीभूत ठरू शकते."

उच्च न्यायालयाच्या निर्णय आणि प्रथम खबरी अहवाल रद्द करण्याचा आदेशाला सध्या आव्हान देण्यात आले आहे.

८. आम्ही अपीलकर्त्याचे वकील श्री. सचिन पाटील, उत्तरवादीचे वकील

श्री. प्रतीक आर. बोम्बार्डे आणि राज्याचे वकील श्री . निशांत रमाकांतराव कटनेश्वरकर यांचे युक्तिवाद ऐकले.

९. अपीलकर्त्याच्या वतीने असा युक्तिवाद करण्यात आला की, भा. दं. वि. च्या कलम ३०६ च्या कक्षेमध्ये प्रकरण आणून फौजदारी प्रक्रिया संहितेमधील अधिकारितेचा वापर करून प्रथम खबरी अहवाल रद्द करवून घेणे हा उत्तरवादीचा आवश्यक हेतू होता हे अभिलेखावरून प्रथमदर्शनी सिद्ध झाले आहे का, या प्रश्नांचा उच्च न्यायालयाने विचार करणे न्याय्य नव्हते . दुसरीकडे, पहिल्या उत्तरवादीच्या वकीलांनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ च्या अंतर्गत अधिकार वापरून एफ.आय.आर. रद्द करण्याची उच्च न्यायालयाची कृती योग्य होती . त्यांच्या युक्तिवादाच्या समर्थनार्थ या न्यायालयाने नेटाई दत्ता विरुद्ध पश्चिम बंगाल राज्य[1], एम . मोहन विरुद्ध राज्य, पोलीस उपअधिक्षक यांच्या माध्यमातून[2], आणि केरळ राज्य व इतर विरुद्ध एस. उन्निकृष्णन नायर आणि इतर[3] या प्रकरणांमध्ये दिलेल्या न्यायनिर्णयांचा आधार घेतला.

१०. **नेटाई दत्ता** (उपरोल्लेखित) प्रकरणात आत्महत्येच्या चिठ्ठीत असे आरोप केले होते की, नेटाई दत्ता आत्महत्या केलेल्या व्यक्तिला अनेक चुकीच्या कृतींमध्ये सामील करीत होता; आत्महत्या केलेल्या व्यक्तिला काही प्रसंगी दिवस-

---

1 **(२००५) २ एस. सी. सी. ६५९**
2 **(२०११) ३ एस. सी. सी. ६२६**
3 **(२०१५) ९ एस. सी. सी. ६३९**

रात्र कार्यस्थळी असणे आवश्यक होते; आणि जरी त्याने हे सांगितले होते की, ज्यावेळी सर्व रेस्टॉरंट्स संध्याकाळी ८ वाजता बंद होतात त्यावेळी तो त्याच्या कामाच्या ठिकाणाहून जाईल, तरी पण नेटाई दत्ताने यावर काहीही उपाय केला नाही. या तथ्यांच्या पार्श्वभूमीवर, या न्यायालयाला असे आढळले की, या प्रकरणात फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत अधिकार वापरणे योग्य आहे.

११. एम . मोहन (उपरोल्लेखित) प्रकरणात, ए-३ ने कामातची (आत्महत्या केलेल्या व्यक्ति) ला सांगितले की, "जर तुला गाडीने जावेसे वाटत असेल, तर तुझे कुटुंबाकडून गाडी आणावी लागेल," आणि त्या नंतर कामातची, तिचा पती आणि मुलाला सार्वजनिक वाहतुकीचा वापर करावा लागला. त्यानंतर काही दिवसांनी आत्महत्या केलेल्या व्यक्तिने आत्महत्या केली. आरोपपत्र दाखल केल्यानंतर, ए-३ ला भा. दं. वि. च्या कलम ३०४-बी, ४९८-ए आणि ३०६ अंतर्गत समन्स जारी करण्यात आले. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४८२ अंतर्गत कार्यवाही दरम्यान, उच्च न्यायालयाने भा. दं. वि. च्या कलम ४९८-ए आणि ३०४-बी अंतर्गत आरोप रद्द केले, परंतु भा. दं. वि. च्या कलम ३०६ अंतर्गत गुन्ह्याबद्दल आरोपीला खटल्याचा सामना करावा लागेल असा निर्णय दिला, ज्या निर्णयाला या न्यायालयात आव्हान देण्यात आले. प्रकरणाच्या परिस्थितीत, या न्यायालयाने पुढील टिप्पण्या परिच्छेद ४८ आणि ४९ मध्ये केल्या:

"४८. या प्रकरणात, चिथावणीच्या उदाहरणांविषयी बोलण्याचे

तर दूरच, अपीलकर्त्यांविरोधात कोणतेही आरोप नाहीत. दिनांक १४-१-२००५ रोजी मृतकाला क्वालिस गाडी वापरण्याची परवानगी नाकारल्याच्या घटनेचा आणि दिनांक १८-१-२००५ रोजी झालेल्या आत्महत्येच्या घटनेचा कोणताही जवळचा संबंध नाही. निःसंदेह, मृतकाने गळफास घेतला. मृतक नक्कीच आपल्या रोजच्या जीवनात घडणाऱ्या साध्या छोट्या गोष्टींवर, भांडणांवर आणि मतभेदांवर अत्यधिक संवेदनशील होती. संयुक्त कुटुंबात, अशा प्रकारची उदाहरणे सामान्य आहेत. प्रत्येक व्यक्तिची संवेदनशीलता एकमेकांपेक्षा वेगळी असते. प्रत्येकाची आत्म-सम्मान आणि आत्म-गौरव याबाबत स्वतःची एक कल्पना असते. विविध लोक एकाच परिस्थितीत वेगवेगळ्या पद्धतीने वागतात. असे आत्महत्येचे दुःखद प्रकरण कुटुंबात घडले, हे दुर्दैवी आहे. पण प्रश्न असा आहे की, अपीलकर्त्यांचा त्या दुर्दैवी घटनेशी कोणत्याही प्रकारे संबंध जोडता येईल का?

४९. अभिलेखावरील संपूर्ण सामग्री आणि या न्यायालयाने जाहीर केलेले कायदे काळजीपूर्वक तपासल्यावर, आपण सुरक्षितपणे असा निष्कर्ष काढू शकतो की, अपीलकर्त्यांचा

भा. दं. वि. च्या कलम ३०६ अंतर्गत गुन्ह्याशी अगदी दूरचा देखील संबंध नाही. इथे हे नमूद करणे महत्त्वाचे आहे की मृतकाचा पती आनंदराज (ए-१) आणि ईस्वरी (ए-३) यांच्या विरोधात गुन्हेगारी कारवाई प्रलंबित आहे."

१२. केरळ राज्य आणि इतर (उपरोल्लेखित) प्रकरणात, ज्यांनी आत्महत्या केली ते एक सीबीआय अधिकारी होते, जे एका गुन्ह्याचा तपास करीत होते. आत्महत्या केलेल्या व्यक्तिने लिहिलेल्या आत्महत्येच्या चिठीमध्ये असे नमूद केले होते की, सीबीआय चे दोन अधिकारी, जे प्रत्यक्षात त्यांचे कनिष्ठ होते, एक वकील तसेच मुख्य न्यायिक मॅजिस्ट्रेट, या आत्महत्येस जबाबदार होते. पुन्हा, घटनांचा विचार करताना, या न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला मान्यता दिली आणि प्रथम खबरी अहवाल रद्द करण्याचा निर्णय कायम ठेवला. या न्यायालयाच्या परिच्छेद १२ मधील टिप्पण्या महत्त्वपूर्ण आहेत. परिच्छेद १२ असा होता:

"१२. प्रस्तुत प्रकरणात सांगितलेल्या तथ्यांची व त्या संदर्भातील अभिलेखावर आणलेल्या पुराव्यावरून आम्हास असे दिसून येते की, आत्महत्येची चिठी ही आरोपांचा आधारस्तंभ म्हणून कार्य करते आणि त्या चिठ्ठीचे योग्य मूल्यांकन करण्यासाठी, आम्ही ती इथे पुन्हा उद्धृत केली आहे. चिठ्ठीचे वरवर वाचन केल्यावर, हे ठरविणे कठीण आहे की,

उत्तरवादींनी कोणतीतरी अपप्रेरणा दिली आहे. चिठ्ठीमध्ये, उत्तरवादींनी त्याला सर्व काही करण्यास भाग पाडले आणि त्याला फसवले आणि त्याला खोल अडचणीत टाकले, याखेरीज अन्य काहीही नमूद केलेले नाही. उत्तरवादी कनिष्ठ पदावर होते आणि असे असताना असे काही घडू शकते, हे आश्चर्यकारक आहे. त्याशिवाय, आरोप खूपच अस्पष्ट आहे. ते कारणाला अडचणीत टाकते, कारण विभागाने त्याला तपास पथकाचे प्रमुख बनवले होते आणि उच्च न्यायालयाने त्याच्यावर पूर्ण विश्वास ठेवून त्याला कोर्टात जाण्याची मुभा दिली होती, अशा परिस्थितीत, त्याला धोका दिला आणि कनिष्ठ पदावरील अधिकाऱ्यांद्वारे अडचणीत टाकले असा विचार करणं अनावश्यक आहे. त्याशिवाय, त्याने मुख्य न्यायिक मॅजिस्ट्रेटवरही आरोप केला आहे की त्याने त्याच्यावर दबाव टाकला होता. त्याने वकिलावरही आरोप केला आहे."

१३. आता, आपण सध्याच्या प्रकरणातील तथ्यांचा विचार करतो. निश्चित आरोप असे आहेत की पहिला उत्तरवादी आत्महत्या केलेल्या व्यक्तिच्या पत्नीला तिच्या मोबाईलवर वारंवार कॉल करत असे आणि तिला त्रास देत असे, हया आरोपांची, आत्महत्या केलेल्या व्यक्तिची आई व पत्नी यांच्या तपासदरम्यान दिलेल्या

जबाबांनी पुष्टी केली आहेत. अभिलेखावरून असे दिसते  की आत्महत्येच्या ३-४ दिवस आधी, आत्महत्या केलेली  व्यक्ति आणि पहिला उत्तरवादी यांच्यात वाद झाला होता. या सर्व घटनांचा विचार करतांना, तसेच आत्महत्येच्या चिठ्ठीमध्ये पहिल्या उत्तरवादी विरोधात निश्चित आरोप केले आहेत, पहिल्या उत्तरवादीचा आत्महत्या करण्यास सहाय्य करणे, चिथावणी  किंवा अपप्रेरणा  देण्याचा आवश्यक हेतू होता का, या प्रश्नाचा विचार करणे उच्च न्यायालयासाठी न्याय्य नव्हते.  अशा स्थितीत, जेव्हा तपास अद्याप पूर्ण झाला नव्हता आणि आरोपपत्र, असले तर, सादर केलेले नव्हते, तेव्हा उच्च न्यायालयाने उत्तरवादीच्या मानसिक घटक किंवा हेतूच्या बाबतीत विचार करण्याची आवश्यकता नव्हती.

१४.  म्हणूनच, आम्हाला अपीलकर्त्याच्या वतीने केलेल्या युक्तिवादात गुणवत्ता आढळते. त्यामुळे, प्रस्तुत अपीलामध्ये आव्हानित केलेला न्यायनिर्णय आणि आदेश रद्द केले जातात आणि सदर अपील मंजूर करण्यात येते. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४८२ अंतर्गत याचिकेमुळे या प्रकरणातील तपास थांबविण्यात आलेला असल्यामुळे, आम्ही संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देतो की त्यांनी लवकरात लवकर तपास पूर्ण करावा.

१५.  आम्ही या प्रकरणाच्या गुणात्मक बाबींवर कोणतेही मत व्यक्त केलेले नाही आणि आम्ही त्यावर मत व्यक्त करणार नाही.  , जेव्हा योग्य वेळ येईल तेव्हा त्याचे योग्य पातळीवर मूल्यांकन केले जाईल.

१६. वरील नमूद केलेल्या विवेचनानुसार अपील मंजूर करण्यात येते.

दिव्या पांडे अपील मंजूर.

---

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच, इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

- x - x - x - x - x - x - x - x - x -